# अमरावती महानगरपालिका, अमरावती.

## स्थानिक संस्था कर विभाग

### LBT बाबत व्यापारी / प्रतिष्ठाने / संबंधितांना सुचना

### क्र. अमनपा/ ज.वि./९१/१२/दि. १ जुलै २०१२

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० चे नियम ९ (३) नुसार आपण महाराष्ट्र VAT रजिस्टर्ड असल्याने LBT साठी नोंदणीकृत आहात (डिमड् रजिस्टर्ड)

२) यासोबत आपले प्रतिष्ठा चे LBT साठी चे नोंदणी प्रमाणपत्र (नमुना ख) पाठविण्यात येत आहे. यामध्ये आपला LBT नोंदणी क्रमांक बारा आकडी डाव्या बाजूस नमूद केलेला आहे. यापूढे सर्व व्यवहारासाठी सदर क्रमांक वापरावा लागेल.

३) तसेच यासोबत अर्ज (नमुना क) पाठविण्यात येत आहे. त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व आवश्यक माहिती भरुन, त्यासोबत अर्जदाराचे दोन पासपोर्ट साईज फोटो (अलिकडील काळातील काढलेले व मागील बाजूस नाव नमुद करुन) आवश्यकतेप्रमाणे प्रतिज्ञापत्र (पार्टनरशिप डील व इतर बाबत) या सह महानगरपालिकेचे **LBT** कार्यालयात सादर करावे. त्यासोबत आपले नोंदणी प्रमाणपत्रावर महानगरपालिका कार्यालयातून इतर आवश्यक नोंदी संबंधीतांकडून अद्यावत करुन घ्याव्या.

४) त्याचप्रमाणे यासोबत LBT बाबत आपले सर्व साधारण माहिती करीता जाहिर प्रसिध्दीकरणाची प्रत पाठविण्यात येत आहे. त्यामध्ये LBT ची सर्व साधारण माहिती दिलेली आहे. तसेच आपणास ठेवावयाच्या खरेदी नोंदवही / मालाची नोंदवही चा नमुना (Form D) नमूद केलेला आहे. त्यामध्ये नमुद बाबींचा अभ्यास करुन योग्य कार्यवाही करावी. तसेच आवश्यक फॉर्म नमुन्यात ठेवण्यात यावी. जेणेकरुन वेळोवेळीचे तपासणीचे वेळी अडचण निर्माण होणार नाही.

५) यासोबत LBT कर भरणा करणेबाबत बँकेत भरावयाच्या चलानची प्रत पाठविण्यात येत आहे. आपण दर महिन्याचे देय LBT हा पुढील महिन्याचे १० तारखेच्या आंत संबंधीत बँकेत (जाहीर प्रसिध्दी करण्यात नमुद बँक खाते क्रमांकांत) सदर चलानचश्रे चार भागात असलेली प्रत भरावयाची आहे.

६) दरमहा विहित केलेल्या दिनांकाचे (१० तारखेच्या आत) आत वेळीच योग्य LBT भरणा करावा व वेळेवर भरणा न केल्याने आपणावर होणारी दंडात्मक कार्यवाही टाळावी.

७) कृपया आपणाकडील सर्व माहिती अचूक देवून दरमहा योग्य व देय LBT वेळवर भरुन व विहित कालावधीत विवरणपत्रे भरुन (रिर्टन) महापालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

**आयुक्त**
**महानगरपालिका, अमरावती.**